# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**मा.पीठासीन, मा.उपपीठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्ष नेता, मा.सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहायक व वाहन चालक यांच्या आयकराची परिगणना करणे, त्यांचे फॉर्म -१६ अ उपलब्ध करणे इत्यादीसाठी दरपत्रके मागविण्याबाबत.**

मा.पीठासीन अधिकारी, मा.उपपीठासीन अधिकारी, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्ष नेता, दोन्ही सभागृहांचे मा.सदस्य तसेच त्यांचे स्वीय सहायक व वाहनचालक यांच्या सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील आयकरासंदर्भातील कामकाजाकरिता खालील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या संस्थाकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा, मा.उपसभापती, विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष विधानसभा, दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्ष नेते व दोन्ही सभागहांचे मा.सदस्य या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या आयकरासंदर्भातील सदरहू कामकाज असून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सांविधानिक स्थान लक्षात घेता उक्त कामाचे गांभीर्य समजून ते जबाबदारीने वेळेत पूर्ण करणे बंधनकारक राहील.

(२) दरपत्रके सादर करणाऱ्या संस्थेस आयकराची परिगणना करणे, फॉर्म-१६अ उपलब्ध करुन देणे, वजा केलेला आयकर विभागाकडे जमा (Return file) करणे व त्याबाबतचे विवरणपत्र त्वरीत उपलब्ध करुन देणे, इत्यादी कामांचा शासकीय विभागांचा किमान ०२ वर्षांचा अनुभव असावा. उक्त कामाचे स्वरुप व गांभीर्य लक्षात घेता दरपत्रके सादर करणाऱ्या संस्थेची यासंदर्भातील अर्हता व कामाचा अनुभव विचारात घेऊन दरपत्रके स्वीकृतीसंदर्भात व कामाचे कंत्राट देण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

(३) दरपत्रके सादर करणाऱ्या संस्थेने दरपत्रके सादर करताना त्यासोबत त्यांचे जी.एस.टी. नोंदणीच्या प्रमाणपत्राची व पॅन कार्डची प्रमाणित (Attested) प्रत सादर करणे आवश्यक आहे.

(४) दरपत्रके सादर करणाऱ्या संस्थेकडे आवश्यक तपशीलाची (data) नोंद ठेऊन आयकराची परिगणना करण्याकरिता स्वतंत्र अद्ययावत संगणक प्रणाली (software) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(५) नियुक्त करण्यात येणाऱ्या संस्थेस उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व माहितीचा (Data) Back Up राखण्याची Data Recovery ची जबाबदारी त्या संस्थेची राहील.

तरी उपरोक्त नमूद आयकर विषयक सेवा देण्यास इच्छूक असल्यास आपले दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यामधून सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई-४०० ०३२ या पत्त्यावर शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ पूर्वी किंवा त्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठविण्यात यावे.

दरपत्रक स्विकृत झाल्यास तसे कळविण्यात येईल, तसेच एखादे दरपत्रक कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार या सचिवालयाने राखून ठेवला आहे, याची कृपया नोंद द्यावी, ही विनंती.

स्वाक्षरी/-

**सचिव-१ (कार्यभार)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई**

\\Mls-h१-०२\d\C. A. appointment\Letter.docx